# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./ आयसीडी/२०२४-२५/२३४

व्यवस्थापन परिषद

**मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२४-२५ मधील**
**दिनांक ९ डिसेंबर, २०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त**

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२४-२५ मधील पंधरावी सभा सोमवार दिनांक ९ डिसेंबर, २०२४ तसेच सौर दिनदर्शिकेनुसार १८ आग्रहायण शके १९४६ रोजी सकाळी ११.०० वाजता आंबेडकर भवन, व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, विद्यानगरी, कालिना, मुंबई ४०० ०९८ येथे आयोजित करण्यात आली होती.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु. क्र. | माननीय सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती/ अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | प्रा. रविंद्र कुलकर्णी ( कुलगुरु) | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | प्रा. अजय भामरे (प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३ | डॉ. शेषाद्री चारी | सदस्य | उपस्थित |
| ४ | डॉ. अनिल कुमार सिंग (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | अनुपस्थित |
| ५ | डॉ. कविता लघाटे (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | अनुपस्थित |
| ६ | डॉ. शिवराम गर्जे | सदस्य | उपस्थित |
| ७ | श्री. संदीप सिंग | सदस्य | उपस्थित |
| ८ | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १० | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ११ | डॉ. प्रसाद कारंडे (कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| १२ | (सी.ए.) हर्षल वाघ (वित्त व लेखा अधिकारी ) | निमंत्रित | उपस्थित |
| १३ | डॉ. पूजा रौंदळे (संचालक, प.व.मु.मं.) | निमंत्रित | उपस्थित |

**स्वागत** : सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून मा.अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विंनती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करून सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

**श्रद्धांजली :**

**स्वाती कर्वे**

मराठी अभ्यासक-संशोधक स्वाती कर्वे यांचे दिनांक ०४ डिसेंबर, २०२४ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्या ७२ वर्षाच्या होत्या.

**प्रा. डॉ. ब.मा. पाटोदेकर**

डॉ. बाबासाहेब आंबडेकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलसचिव प्रा. डॉ. बलभीम मारुतीराव पाटोदेकर यांचे दिनांक ०४ डिसेंबर, २०२४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८७ वर्षाचे होते.

**सुनीती कुमार पाठक**

राष्ट्रपती पुरस्कार विजेते आणि बौद्ध अभ्यासाचे प्रसिद्ध अभ्यासक सुनीती कुमार पाठक यांचे दिनांक ०५ डिसेंबर, २०२४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते १०१ वर्षाचे होते.

**मधुकरराव पिचड**

माजी आदिवासी विकास मंत्री मधुकरराव पिचड यांचे दिनांक ०६ डिसेंबर,२०२४ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८४ वर्षाचे होते.

**डॉ. मनोहर डोळे**

पद्मश्री पुरस्कारीत जुन्या काळातील प्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ. मनोहर डोळे यांचे दिनांक ०६ डिसेंबर, २०२४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९७ वर्षाचे होते.

माननीय सर्व सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहिली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| १ | दिनांक ०५ डिसेंबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करणे. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दिनांक ०५ डिसेंबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या इतिवृतास मान्यता देण्यात आली.<br>तसेच इतिवृतामधील बाब क्र. ५ मधील ठरावात खालील प्रमाणे दुरुस्ती सुचविण्यात आली.<br>"अधिष्ठाता मंडळाच्या दिनांक ३ सप्टेंबर २०२४ रोजीच्या बाब क्रमांक २.८ चा ठराव व्यवस्थापन परिषदेमध्ये मान्य करण्यात आला."<br>**च्या ऐवजी**<br>"अधिष्ठाता मंडळाच्या ठरावानुसार आर.डी. नॅशनल महाविद्यालयातील सी.डी.सी. निवडणूक प्रक्रिया रद्द करण्यात आली असून महाविद्यालयाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ आणि विद्यापीठाच्या परिपत्रकाचे अनुपालन करून त्वरित निवडणूक घ्यावी, असे ठरले." **असे वाचावे**. | |

| | | |
|---|---|---|
| २ | संजीवन ग्रामीण वैद्यकीय अँड सामाजिक सहायता प्रतिष्ठानचे, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, मु. पो. औंदे, ता. विक्रमगड, जि.पालघर - ४०१ ६०५ या महाविद्यालयाविरोधात प्राप्त तक्रारीबाबत नियुक्त समितीचा प्राप्त अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे विचारार्थ व मान्यतेसाठी ठेवण्यात येत आहे. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | संजीवन ग्रामीण वैद्यकीय अँड सामाजिक सहायता प्रतिष्ठानचे, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, मु. पो. औंदे, ता. विक्रमगड, जि.पालघर - ४०१ ६०५ या महाविद्यालयाविरोधात प्राप्त तक्रारीबाबत नियुक्त समितीचा प्राप्त अहवाल स्वीकारण्यात आला. सदर अहवालावर सविस्तर चर्चा करण्यात आली व खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.<br>१) प्रभारी प्राचार्य यांची मान्यता तात्काळ रद्द करण्यात यावी.<br>२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२ मधील पोटकलम १४ नुसार संबंधित महाविद्यालयाची चौकशी करण्यात यावी.<br>३) संबंधित महाविद्यालयाची संलग्नता काढून घेण्यासंबंधी अधिष्ठाता मंडळासमोर बाब ठेवण्यात यावी.<br>४) तदनंतर विद्यापरिषदेच्या ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. | |
| ३ | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधिल कलम ९७ नुसार ज्या महाविद्यालयांनी (कारणे दाखवा नोटीस दिल्यानंतर) महाविद्यालय विकास समिती गठित (CDC) केली नाही अशा महाविद्यालयांवर कारवाई करण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात येत आहे. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | सदर बाबीवर सविस्तर चर्चा करण्यात आली, चर्चअंती असे ठरले की जे महाविद्यालय ३१ डिसेंबर, २०२४ पर्येंत सी.डी.सी. स्थापन करणार नाहीत अशा महाविद्यालयास तात्काळ परिपत्रक निर्गमित करण्यात यावे की, त्या सर्व महाविद्यालयांच्या पुढील वर्षी पासून (२०२५-२०२६) प्रथम वर्षाच्या नोंदणी (Enrolment) आणि प्रवेश (Admission) प्रक्रिया थांबविण्यात येतील. | |
| ४ | विद्यार्थी किंवा महाविद्यालयाकडून चुकीचा परीक्षा अर्ज भरला गेला असल्यास करण्यात येणाऱ्या दंडात्मक कार्यवाही बाबत मान्यता व विचारार्थ सादर. | परीक्षा विभाग |
| ठराव | विद्यार्थी किंवा महाविद्यालयाकडून चुकीचा परीक्षा अर्ज भरला गेला असल्यास करण्यात येणाऱ्या दंडात्मक कार्यवाही बाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.<br>१) सदर प्रकरणात संबंधित महाविद्यालयास रुपये पंचवीस हजार फक्त दंड आकारण्यात यावा. सदर दंड महाविद्यालयाने ३१ डिसेंबर, २०२४ पर्येंत भरावा.<br>२) विहित मुदतीत दंड न भरल्यास १२% (Simple Interest) व्याज दर, लावण्यात यावा. सदर दंड ऑनलाईन माध्यमाने घेण्यात यावा. एका दिवसाचा सुद्धा विलंब झाल्यास त्यासाठी एक महिन्याचे व्याज आकारण्यात येईल.<br>३) अशा प्रकारची चूक महाविद्यालयाकडून पुनः होऊ नये, असे ताकीद पत्र विद्यापीठाकडून देण्यात यावे.<br>४) दंड भरल्यानंतर निकाल जाहीर करावा.<br>५) सदर दंड भरल्याचे पत्र अधिष्ठाता मंडळापुढे ठेवण्यात यावे. | |

| | | |
|---|---|---|
| | ६) इथून पुढे अशा प्रकारची चूकांसाठी उपरोक्त तरतूद करण्यात यावी. हा निर्णय या सारख्या इतर प्रकरणांना सुद्धा लागू राहील.<br>७) बाळासाहेब ठाकरे विधी महाविद्यालयासंबंधी कार्यवाही दिनांक २४ डिसेंबर, २०२४ पर्येंत पूर्ण करावी. | |
| ५ | प्रा. (डॉ.) देवेन शहा यांच्या समितीने अभियांत्रिकी महाविद्यालयासंबंधित सादर केलेला अहवाल शासनास पाठविण्याकरिताची बाब व्यवस्थापन परिषदेपुढे मान्यतेस्तव सादर. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | सदर अहवालाबाबत तीन ते चार शिक्षकांची टीम बनवून प्रत्येक टीम मध्ये समसमान महाविद्यालयांची वाटणी करून सर्व महाविद्यालयांच्या कागदपत्रांची तपासणी टीमने करावी. कोणत्या महाविद्यालयाने अहवालाच्या अनुषंगाने कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे किंवा नाही याची सत्यता पडताळणी टीमने करावी, त्याचा परिपूर्ण अहवाल तयार करावा, असे ठरले. तसेच समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आले. | |
| ६ | The recommendations made by the Academic Council at its meeting held on 28th June, 2024 vide item no. 9.8 is being placed before the Management Council for its consideration and approval. | College Teachers Approval Unit |
| ठराव | The recommendations made by the Academic Council at its meeting held on 28th June, 2024 vide item no. 9.8 is accepted | |
| ७ | काही महाविद्यालयांनी एम.के.सी.एल. पोर्टलवर नाव नोंदणी केलेली नाही. सदर वस्तुस्थिती लक्षात घेता, व्दितीय व तृतीय वर्ष प्रक्रियेकरीता विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये. याकरिता एम.के.सी.एल. पोर्टलवर प्रवेश प्रक्रिये करिता प्रवेश नोंदणी लिंक संदर्भ क्र.१ नुसार विलंबशुल्कासहित चालू करून देण्याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. | Admission, Enrolment, Eligibility & Migration Department |
| ठराव | उपरोक्त संदर्भात असा निर्णय झाला की प्रथम वर्ष पदवी प्रवेश करिता समस्यांचे वर्गीकरण खालील प्रमाणे करण्यात आले.<br>अ) नवीन महाविद्यालय तांत्रिक अडचणी मुळे फॉर्म भरला नाही.<br>ब) विद्यार्थाने एका कोर्सला फॉर्म भरला आणि दुसऱ्या कोर्सला प्रवेश घेतला आहे .<br>क) विद्यार्थाने एका महाविद्यालयात फॉर्म भरला आणि प्रवेश दुसऱ्या महाविद्यलयात घेतला आहे.<br>ड) काही विद्यार्थ्यांचे पीआरएन जनरेट झाले नाही आणि विद्यार्थाना द्वितीय व तृतीय वर्षात प्रवेश देण्यात आले.<br>नमूद (अ) समस्यांकरिता फॉर्म भरण्यास मान्यता देण्यात आली. वर नमूद (ब) आणि (क) समस्यांकरिता एक शेवटची संधी देण्यास मान्यता देण्यात आली. आणि अशा महाविद्यालयांना प्रत्येक विद्यार्थ्यांच्या एकूण प्रवेश शुल्काच्या दुप्पट रक्कम दंड आकारण्यात यावा. असे ठरले. तसेच नमूद (ड) समस्यांकरिता रुपये ५,०००/- (पाच हजार) प्रति विद्यार्थी दंड आकारण्यात यावे. असे ठरले.<br>वरील दंड हे फक्त याच वर्षाकरिता आहे आणि विभागाने दिलेल्या विद्यार्थी संख्येसाठीच मर्यादित आहे. महाविद्यालयाने विद्यार्थी संख्येनुसार मान्यता देण्यात आलेली आहे, याशिवाय इतर विद्यार्थी फॉर्म भरणार नाही याची जबाबदारी संबंधित | |

| | | |
|---|---|---|
| | विभागाची असेल. | |
| ८ | For adding name of Justice Sandeep K. Shinde(Retire Judge), Mr. Ranvir Shekhawat, Mr. Jagdish Chaudhari into the list of existing Panel of the University Advocates. | Legal / RTI Grievance section |
| ठराव | याबाबत असा निर्णय घेण्यात आला की निवृत्त न्यायाधीश संदीप के. शिंदे, श्री. रणवीर शेखावत व श्री. जगदीश चौधरी यांना मुंबई विद्यापीठाने ठरवलेले दर पत्रकानुसार विद्यापीठाच्या **University Panel of Advocates** मध्ये समावेश करण्यात यावा. | |
| Arising out of discussion matter | | |
| ९ | Considering the difficulties and challenges in identifying penalty amounts received from colleges and students in the existing university account, the Finance and Accounts Officer has directed the creation of a new, dedicated account. | FAO |
| ठराव | This account will be exclusively designated to handle all penalty amounts, enabling the Finance and Accounts Department to efficiently manage, track, and report these funds. All penalty amounts will primarily be received through online payment methods. However, in unavoidable circumstances, penalties may be accepted via Demand Draft (DD) as an exception. | |
| १० | मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी व इतर परिसरातील अथवा परिसराजवळील जागा आणि प्लॉट्स याबाबत तहसील ऑफिस जिल्हाधिकारी मुंबई महानगरपालिका कार्यालय याबाबत पाठपुरावा करण्यासाठी एक Liaising Officer ची नियुक्ती करण्याबाबत | **HRDC/ Registrar's Secretariats** |
| ठराव | याबाबत असा निर्णय घेण्यात आला की, श्री विजय नाईक, सेवानिवृत्त, महसूल विभाग यांची दरमहा रू. ३०,०००/- मानधनावर Liaising Officer ची नियुक्ती करण्यासाठी मान्यता देण्यात अली. | |

May be approved

कुलसचिव

प्र- कुलगुरू

मा. कुलगुरू